# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २०/०५/२०२६

## पोलीस स्टेशन पारशिवनी येथील कंटेनर मधून लॅपटॉप चोरीच्या गुन्ह्यातील आंतरराज्यीय चोरास अटक करून एकूण ४६४ लॅपटॉप किं. ४ कोटी १९ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत

## (स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन पारशिवनी ने राजस्थान पोलीसांसह मिळून केली संयुक्त कारवाई)

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०९/०५/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे फिर्यादि नामे प्रितम लालसिंग ढिल्लन वय ३८ वर्षे रा. बनीपूर, तह. बावल जि. रेवाडी, हरियाना यांच्या तक्रारीवरून अप.क्रं. २७९/२०२६ कलम ३१६(३), ३(५) भारतीय न्यास संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणातील फिर्यादि यांची ट्रान्सपोर्ट कंपनी असून त्यांचे कंपनीला ब्लू डार्ट कंपनीकडून लॅपटॉप ट्रान्सपोर्ट करण्याचा ऑर्डर मिळाला असता ब्लू डार्ट कंपनीने फिर्यादिचा कंटेनर क्रं. आर.जे. ३/जे.ई. १२१२ मध्ये एकूण ६४१ नग लॅपटॉप व टॅब्लेट किं. ५,७१,९६,६९९/— रू. आणि एलएडी डिफ्युजर सामान किं. ६०००/— असा एकूण ५,७२,०२,६९९/— रू. मुद्देमाल लोड करून गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान यांना चेन्नई वरून गाडी सह सदर माल बिलासपूर ला पोच करण्यासाठी पाठविले असता यातील आरोपी क्रं. ०१) गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि आरोपी क्रं. २) क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान यांनी पो.स्टे. पारशिवनी हद्दीत आल्यानंतर खंडाळा, डुमरी गावातील, राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४४ वरील आशु ढाब्या जवळ गाडी उभी करून गाडीतील कूण ६४१ नग लॅपटॉप व

टॅब्लेट किं. ५,७१,९६,६९९/— रू. आणि एलएडी डिफ्युजर सामान किं. ६०००/— असा एकूण ५,७२,०२,६९९/— रू. मुद्देमाल चोरून नेल्याची फिर्यादि यांनी तक्रार दिल्याने नमूद आरोपीतांवर पो.स्टे. पारशिवनी येथे अप.क्रं. २७९/२०२६ कलम ३१६(३), ३(५) भारतीय न्यास संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेवून आरोपी व चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याचे स्थानिक गुन्हे शाखा तसेच पो.स्टे. पारशिवनी यांना आदेशित करून तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे तसेच पारशिवनी पोलीसांचे पथक तयार करून संयुक्तपणे आरोपींचा शोध घेण्यास रवाना केले असता सदर पथक तात्काळ आरोपीच्या राहते घरी राजस्थान येथे राजस्थान च्या स्थानिक पोलीसांसह गेले असता आरोपी क्रं. ०१) गाडी चालक नामे अरशद सुबेदिन खान वय ४७ वर्षे रा. पिरूका तह. पाहरी जि. भरतपूर, राजस्थान आणि आरोपी क्रं. २) क्लिनर साजीद असलुफ खान वय ३० वर्षे रा. बालराका, तह. आलमशाह, जि. भरतपूर, राजस्थान हे घरी हजर मिळून आले नाही. करिता स्था.गु.शा. आणि पोलीस स्टेशन पारशिवनी च्या पथकाने राजस्थान आणि हरियाना राज्यातील नुह, मेवात आणि भरतपूर या भागात एका आठवड्यापासून कशोशिने तांत्रिक पुरावे, सिसीटीव्ही फुटेज आणि खबरी यांचे माध्यमाने आरोपींचा शोध घेत असता नमूद गुन्ह्यात वरील दोन्ही आरोपीतांसह **अजहरूद्दीन उर्फ हजरूद्दीन इद्रिस वय २८ वर्षे रा. खल्लूका तह. पहाडी जि. डीग, राजस्थान** हा सुध्दा गुन्ह्यात सामील असल्याचे समजल्याने सदर पथकाने स्थानिक पोलीसांसह सदर आरोपीस ताब्यात घेतले व त्याची अतिशय संयमाने व कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली, सदर आरोपीकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ४६४ नग लॅपटॉप किं. ४,१४,०२,९१५/— रू. तसेच गुन्ह्यात वापरलेली वाहन मारूती सुझुकी बलेनो कार क्रं. एच.आर.२७ एल.

४४९६ किं.अं. ५,००,०००/— असा एकूण ४,१९,०२,९१५/— रू. चा मुद्देमाल जप्त करूण आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात यातील आरोपीतांसह आणखी ७ आरोपी असे एकूण ९ आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून इतर आरोपींचा शोध आणि गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. सदर आरोपींवर राजस्थान व इतर राज्यातही अनेक गंभीर गुन्हे असल्याचे त्यांचे गुन्हे अभिलेखावरून निष्पन्न झालेले असून ते आंरराज्यीय गुन्हे करण्यात सक्रीय असल्याचे निदर्शनास आले आहे. गुन्ह्यातील महत्वाचा आरोपी अटक झालेला असून इतर आरोपींचे मुसक्या आवळणे सुरू आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस, अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रमेश बरकते व पोलीस निरीक्षक श्री. राजेशकुमार थोरात, ठाणेदार पो.स्टे. पारशिवनी व पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि पो.स्टे. पारशिवनी चे पथक यांनी विशेष परिश्रम घेवुन गुन्हा उघडकीस आणला.


पुलिस थाना पहाड़
जिला- डीग (राज.)
HR 27L 4496

The Hitavada
Nagpur City Line | 2026-05-21 | Page- 4
ehitavada.com

# Inter-state gang busted in laptop theft case; 464 laptops worth Rs 4.19 crore recovered

■ **Staff Reporter**



IN A major breakthrough, the Parseoni Police and the Local Crime Branch (LCB) of Nagpur Rural Police have cracked a high-value laptop theft case and arrested one accused linked to the crime. During the operation, police recovered 464 stolen laptops and other property worth more than Rs 4.19 crore.

The case was registered at Parseoni Police Station on May 9 after transport businessman Pritam Lalsingh Dhillon, a resident of Rewari district in Haryana, approached the police with a complaint.

According to investigators, Dhillon's transport company had been assigned by Blue Dart to transport a consignment of electronic goods from Chennai to Bilaspur. The shipment included 641 laptops and tablets valued at Rs 5.71 crore, along with LED diffuser equipment worth Rs 6,000. The goods were loaded into a container truck (RJ-03/JE-1212). Police said, the truck was being driven by Arshad Subedin Khan, while Sajid Asluf Khan was working as the cleaner. During the journey, the duo allegedly stopped the vehicle near Ashu Dhaba on National Highway 44 at Khandala-Dumri village under the jurisdiction of Parseoni Police Station and stole the costly electronic goods.

Police teams were sent to Rajasthan along with local police personnel, but the driver and cleaner had already vanished.

Police then launched an intensive week-long search operation across the Nuh, Mewat and Bharatpur regions of Rajasthan and Haryana.

Investigators relied on CCTV footage, technical evidence and information gathered through local sources to track down the suspects.

During the investigation, police identified another accused, Azharuddin alias Hazaruddin Idris, as one of the key members involved in the conspiracy. With the help of Rajasthan Police, he was detained and questioned. During interrogation, he allegedly confessed to his role in the crime.

Police recovered 464 stolen laptops worth Rs 4.14 crore from his possession. They also seized a Maruti Suzuki Baleno car, allegedly used in the offence. Altogether, property worth Rs 4.19 crore has been recovered so far. Police said the arrested accused has a criminal background and is believed to be involved in several serious offences across Rajasthan and other states. Police have identified seven more accomplices in the case, taking the total number of accused to nine. Efforts are currently underway to trace and arrest the remaining accused, while the case is under active investigation. The arrest was made under the guidance of Superintendent of Police (SP) Dr Harssh Poddar and Addl SP Anil Mhaske.

# Interstate cargo theft cracked: 464 laptops and tablets worth ₹4cr seized, one nabbed from Raj

**Soumitra.Bose**@timesofindia.com

**Nagpur:** A key member of an interstate theft syndicate was arrested by Nagpur Rural Police in a joint operation with Rajasthan cops, leading to the recovery of 464 laptops and tablets worth ₹4.14 crore. The accused, Azharuddin alias Idris, is a resident of Deeg in Rajasthan.

Police said Idris and his two accomplices stole a consignment comprising 641 laptops and tablets valued at Rs5.71 crore, along with LED diffuser accessories worth Rs6,000, around May 9. The consignment was being transported from Chennai to Bilaspur by the accused.

## WELL-ORGANISED SYNDICATE



➤ Investigators said the accused have criminal records in Rajasthan and other states, pointing to a well-organised interstate syndicate

➤ The operation was led by SDPO Ramesh Barkate, Parsheoni police inspector Rajesh Kumar Thorat, and Local Crime Branch inspector Ankush Mane under the supervision of seniors

➤ Nagpur Rural Police have urged transporters and logistics firms to verify driver credentials thoroughly and remain alert while handling high-value consignments

Investigators said the accused diverted the container truck and shifted the electronic goods into a car near a dhaba on National Highway 44 at Dumri village before fleeing towards the Rajasthan-Haryana border.

As the cargo went missing within Parsheoni police station limits, transport company owner Pritam Lal Singh Dhillon, a Haryana resident, lodged a complaint, following which Nagpur Rural SP Harssh A Poddar and addl SP Anil Mhaske formed a special team comprising officials from the Local Crime Branch and Parsheoni police. The team coordinated with Rajasthan Police and conducted searches in Nuh, Mewat, and Bharatpur along the Rajasthan-Haryana border. Using technical surveillance, CCTV footage from Deeg, and intelligence inputs, police tracked down and arrested Idris.

During interrogation, Idris confessed to involvement in the crime along with the prime accused — driver Arshad Khan, 47, and cleaner Sajid Asluf Khan, 30, both residents of Bharatpur. The duo along with remaining members of the nine-member gang are also on the run, and efforts are underway to trace them. Further recoveries are expected. A car used in the crime, valued at ₹5 lakh, was also seized.

# सहा कोटींच्या 'लॅपटॉप' चोरीचा छडा

## आंतरराज्यीय टोळीच्या सूत्रधाराला अटक; ४६४ लॅपटॉप जप्त

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** पारशिवनी परिसरात लॅपटॉपने भरलेल्या ब्लू डार्ट कंपनीच्या कंटेनरवरील दरोड्याचा अखेर नागपूर ग्रामीण पोलिसांनी बुधवारी छडा लावला. स्थानिक गुन्हे शाखा, पारशिवनी पोलीस आणि राजस्थान पोलिसांच्या संयुक्त कारवाईत टोळीच्या सूत्रधाराला अटक करण्यात आली असून चोरीस गेलेल्या ६४१ पैकी ४६४ लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमालाची किंमत तब्बल ४ कोटी १९ लाख रुपये आहे.

चेन्नईहून बिलासपूरकडे निघालेल्या कंटेनरमध्ये लिनोव्हो आणि मोटोरोला कंपनीचे ६४१ नवीन लॅपटॉप होते. ३ मेच्या रात्री राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील खंडाळा-डुमरी परिसरातील एका ढाब्यावर कंटेनर थांबवण्यात आला. याचवेळी दिल्लीहून विमानाने नागपुरात पोहोचलेल्या हायटेक चोरट्यांनी चालकाच्या केबिनमधून कंटेनरचा मागील भाग कापून लॅपटॉप दुसऱ्या वाहनात भरले आणि राजस्थानच्या दिशेने पसार झाले. विशेष म्हणजे, या संपूर्ण कटात कंटेनर चालक आणि क्लिनरच सहभागी असल्याचे तपासात उघड झाले. चोरीनंतर आरोपी पुन्हा नागपूरमार्गे दिल्लीला पळाले..

### पूर्वीही अनेक गुन्ह्यांत सहभाग



या टोळीवर राजस्थानसह विविध राज्यांत मालवाहतूक कंटेनर लुटण्याचे आणि महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू चोरी करण्याचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली. ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणातील मुद्देमाल हस्तगत करत टोळीच्या कारवायांना आळा घातला आहे.

**१० दिवसांचा पाठलाग, राजस्थानात सापडला सूत्रधार**

अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अंकूश माने यांनी विशेष पथक राजस्थान आणि हरियाणात रवाना केले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि खबऱ्यांच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी राजस्थानातील डीग जिल्ह्यातून अजहरूद्दीन उर्फ हजरुद्दीन इद्रिस (२८) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीतील ४६४ लॅपटॉप आणि गुन्ह्यात वापरलेली बलेनो कार जप्त करण्यात आली.

तपासादरम्यान या गुन्ह्यात एकूण नऊ आरोपी सहभागी असल्याचे निष्पन्न झाले. हे सर्व राजस्थान-हरियाणाच्या सीमावर्ती भागातील पलवल, भरतपूर, डीग आणि मेवात परिसरातील असल्याचे समोर आले. फरदीन उर्फ फानू इद्रिस खान, मोहम्मद जाहीद खान, परवेज, आमीर उर्फ कल्लू, जाहुल अमरू खान आणि टायगर उर्फ अब्दुल हक यांच्यासह इतर आरोपी अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

तरुण भारत
Nagpur Pages | 2026-05-21 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# चोरांच्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

**▮ पारशिवनीत झाला होता गुन्हा दाखल ▮ सुमारे ४ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त**



◆ **नागपूर, २० मे**

एखाद्या कंपनीचा माल पोहोचवून देण्यासाठी हाती घ्यायचा अन् नंतर त्याची विल्हेवाट लावत चोरीची तक्रार करायची. अशा स्वरूपाचा गोरखधंदा करीत कोट्यवधी रुपयांचा चुना लावणाऱ्या चोरांच्या आंतरराज्यीय टोळीचा अखेर ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला व ४६४ नग लॅपटॉप आणि कार असा ४ कोटी २० लाखांचा माल जप्त करण्यात यश संपादन केले.

अजहरुद्दीन इद्रिस रा. खल्लूका पहाडी राजस्थान असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. हरयाणातील बनिपूर येथील निवासी प्रीतम लालसिंग ढिल्लन यांनी पारशिवनी पोलिस स्टेशनला येऊन कंटेनरमधील माल चोरीस गेल्याची तक्रार दाखल केली होती. प्रीतम ढिल्लन यांची ट्रान्सपोर्ट कंपनी आहे. त्यांच्या कंपनीला चेन्नई येथील ब्लू डार्ट कंपनीच्या गोदामातून बिलासपूर येथे लॅपटॉप पोहोचवून देण्याचे काम मिळाले होते. त्यानुसार चालक अरशद सुबेदिन खान आणि साजिद असलूफ खान आरजे ३ जेई १२१२ क्रमांकाच्या कंटेनरमध्ये ५ कोटी ७१ लाख ९६ हजार ६९९ रुपयांचे ६४१ नग लॅपटॉप आणि टॅब्लेट भरून बिलासपूर येथे जाण्यासाठी निघाले. दरम्यान, दोघे खंडाळा डुमरी गावातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील आशू ढाब्याजवळ थांबले होते. तेव्हा कंटेनरमधील ६४१ नग लॅपटॉप तसेच टॅब्लेट अज्ञात आरोपींनी चोरून नेल्याची तक्रार त्यांनी पारशिवनी पोलिसांत केली. त्यानुसार पारशिवनी ठाण्यात कलम ३१६ (३), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी पुढाकार घेत तातडीने तपास करून चोरीस गेलेला माल जप्त करण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखा आणि पारशिवनी पोलिसांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत संयुक्तपणे राजस्थानात जाऊन नूह, मेवात, भरतपूर या भागांत आरोपींचा शोध सुरू केला. तेव्हा आरोपी अरशद खान, साजिद खान दोघेही घरी हजर नव्हते.

आता काय करायचे म्हणून ग्रामीण पोलिसांनी तिथेच मुक्काम ठोकून खबऱ्यांना कामाला लावले. विशेष म्हणजे अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनीही राजस्थानातील आरोपींचा शोध घेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत अनेकांचा ठावठिकाणा शोधून काढला. अखेर अजहरुद्दीन इद्रिस हा आरोपी त्या गुन्ह्यात सहभागी असल्याची गुप्त माहिती पोलिसांच्या हाती लागली.

पथकातील डीवायएसपी रमेश बरकते, पोलिस निरीक्षक राजेशकुमार थोरात, अंकुश माने यांच्यासह पथकाने जिवावर उदार होत आरोपीला ताब्यात घेतले. त्याची चौकशी करून नेमका प्रकार काय आहे याची माहिती घेतली गेली. तेव्हा त्याने लॅपटॉप चोरल्याची कबुली दिली. एवढेच नव्हे तर ते लॅपटॉप कुठे ठेवले हेही सांगितले. पोलिसांनी ४६४ नग लॅपटॉप, एचआर २७ एल ४४९६ क्रमांकाची कार जप्त केली. सुमारे ४ कोटी १९ लाख २ हजार ९१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*